सामना

# क्विक हील फाउंडेशनतर्फे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा पर्व

***क्विक हील*** फाउंडेशन या जागतिक सायबर सुरक्षा सोल्युशन्स प्रदाता क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडच्या सीएसआर शाखेने पुण्यात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' पर्वाचे आयोजन केले. याप्रसंगी क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी नॉर्थ महाराष्ट्र युनिव्हर्सिटीचे कुलगुरू व्ही. एल. महेश्वरी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवार, महाराष्ट्र सायबरचे पोलीस अधीक्षक संजय शिंत्रे यांच्यासह विविध संस्थांमधील शिक्षणतज्ज्ञ या कार्यक्रमाला उपस्थित होते. सायबर सुरक्षेसाठी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रमाचा जनतेमध्ये विशेषतः समाजाच्या वंचित समुदायांमध्ये सायबर सुरक्षिततेचे महत्त्व आणि डिजिटल विश्वामध्ये पालन करण्यासाठी या उपकमाअंतर्गत ४७ लाखांहून अधिक विद्यार्थी, शिक्षण आणि सामान्य व्यक्तींना स्थानिक शैक्षणिक संस्थांसोबत सहयोग व पथनाट्यांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंबाबत जागरूक केले.

सामना